**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाने बनविला सिल्व्हर नॅनो मास्क**
**कोरोना संसर्गापासून होणार संरक्षण**
**कुलगुरूंचे हस्ते उद्‌घाटन**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाने नॅनो टेक्नॉलॉजी विषयात केलेल्या संशोधनाची जागतिक पातळीवर नोंद घेतल्या गेली असून कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर या विभागातील प्रा.डॉ. अनिकेत गादे व डॉ. होमिभाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई येथील डॉ. राजेश राऊत यांनी माजी विभागप्रमुख तथा युजीसी बी.एस.आर. फेलो डॉ. महेंद्रकुमार रॉय यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्व्हर नॅनो मास्क तयार केला आहे. या मास्कमुळे कोरोना संसर्गापासून संरक्षण होणार असून त्याचे उद्‌घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या शुभहस्ते आज करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, अधिसभा सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, श्री संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे, रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे, रसायनशास्त्र विभागातील डॉ. राजेंद्र प्रसाद उपस्थित होते.

विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाने तयार केलेल्या सिल्व्हर नॅनो मास्क वापरण्यास हलका व श्वास घेण्यासाठी ९९ टक्के सुलभ असून वारंवार धुता येवून, त्याचा पुर्नवापर करता येतो. त्वचेला साजेसा व व्यवस्थित फिटींगमध्ये बसणारा आहे. सिल्व्हर नॅनो पार्टिकल कडूनिंबाच्या एक्स्ट्रॅक्ट पासून तयार केला असून ट्रिपल लेअर मास्क अशी बांधणी असून बाहेरच्या लेअरला सिल्व्हर नॅनो पार्टिकल्स कोटिंग आहे. मास्कमुळे कोरोनामुळे संसर्ग होण्यापासून संरक्षण प्राप्त होणार आहे. युरोपियन स्टॅण्डर्ड टाईप २ प्रकारचा हा मास्क आहे. या मास्कवरील सिल्व्हर नॅनो पार्टिकलमुळे सर्व जिवाणू व विषाणूचा नाश होणार आहे. शासकीय टेक्सटाईल रिसर्च लेबॉरटरीने हा मास्क परीक्षण केला असून ९९.९ टक्के कार्यक्षम असल्याचे सिद्ध केले आहे.

स्वस्त किंमतीत हा मास्क तयार झाला असून प्रो.डॉ. महेंद्रकुमार रॉय आणि त्यांच्या चमूने मास्कमधील ॲन्टीव्हायरल प्रापर्टीज सार्स कोव्हिड - २ च्या विरुद्ध तपासल्या असून त्यासाठी इटालियन रिसर्च कोलॅबोरॅटरप्रो. मॅसिमिलिअनो गॅलडिईरो यांचे सहकार्य लाभले आहे. अमोघ बायोसोल्युशन प्रा.लि. अमरावती व एस.ए.आर. एंटरप्राईजेस प्रा.लि. मुंबई सदर मास्कच्या कमर्शियल उत्पादनासाठी पुढाकार घेत आहे. मास्क निर्मितीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगांवकर यांचे सहकार्य यासाठी लाभले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २५/११/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी